MHLA050000162025

नियमीत दिवाणी दावा क्र.०३/२०२५
सुनिता वि. शासन

## नि.क्र.२२ खालील आदेश

**०१.** प्रतिवादी क्र.४ ने सदर अर्ज देवून नमूद केले की, कैफीयत देण्यासाठी त्याला ८२ दिवसांचा विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र.४ हा वैद्यकीय उपचारासाठी परगावी असल्याने वेळेत कैफीयत देवू शकलेला नाही. त्यामुळे, झालेला विलंब माफ व्हावा अशी विनंती करण्यात आली.

**०२.** वादीने दिलेल्या म्हणण्यानूसार न्यायालयाने योग्य ते आदेश आपल्या मर्जीत करावेत.

**०३.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी हे दि.१२/०२/२०२५ रोजी समन्स बजावणी झाल्यानंतर दि.१८/०२/२०२५ रोजी दाव्यात हजर झाले. दि.१२/०२/२०२५ पासून पुढे ३० दिवसांत व जास्तीत जास्त ९० दिवसांत सदर कैफीयत दाखल होणे आवश्यक होते. प्रतिवादी क्र.४ चे ३० दिवस दि.१४/०३/२०२५ रोजी संपले. त्यापुढील ६० दिवस दि.१३/०५/२०२५ रोजी संपले. मात्र, उन्हाळी सुट्टी न्यायालयास दि.१३/०५/२०२५ पासून सुरु झाल्याने न्यायालय पुन्हा सुरु झाल्यावर दि.१०/०६/२०२५ रोजी सदर कैफीयत देणे आवश्यक होते. सदर अर्ज दि.०३/०९/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे, त्यास ८५ दिवसांचा विलंब झाला आहे. अर्जात नमूद कारण व त्याबद्दल शपथेवर केलेले कथन विचारात घेता रक्कम रुपये ५००/- इतका खर्च वादीस देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

**दिनांक:०३/०९/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**